| Date | Media outlet | Headline | Edition | AVE |
|---|---|---|---|---|
| Oct 15 | Tarun Bharat | JSPL Foundation launches Rashtriya Swayamsiddh Samman | Pune | 35200 |

# खेड्यापाड्यातील मांझींना प्रकाशात आणणार

## जेएसपीएलकडून होणार 'राष्ट्रीय स्वयंसिद्ध पुरस्कारा'ने सन्मान : जेएसपीएल फाऊंडेशनचा उपक्रम

प्रतिनिधी
पुणे

'माऊंटन मॅन' असा लौकिक असलेल्या दशरथ मांझी यांच्याप्रमाणे धैर्य व चिकाटीचे दर्शन घडवीत प्रेरणादायी काम करणाऱ्या खेड्यापाड्यांतील मांझींच्या कथा आता प्रकाशात आणल्या जाणार आहेत. त्याचबरोबर 'राष्ट्रीय स्वयंसिद्ध पुरस्कारा'नेही अशा व्यक्तींचा गौरव करण्यात येणार आहे. जिंदाल स्टिल अँड पॉवर लि.च्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रम राबविणाऱ्या जेएसपीएल फाऊंडेशनकडून हा उपक्रम राबविला जाणार आहे.

फाऊंडेशनच्या अध्यक्षा शल्लू जिंदाल यांनी मंगळवारी ही माहिती दिली.

बिहारमधील गयाजवळच्या दशरथ मांझी याने २२ वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर डोंगर फोडून रस्ता बनविला. भारतात असे अनेक दशरथ मांझी आहेत. मात्र, त्यांचे कार्य समाजासमोर येऊ शकलेले नाही. अशा सर्वांच्या कहाण्या जगासमोर आणण्याचा फाऊंडेशनचा संकल्प आहे. अपरिमित धैर्य, वचनबद्धता, आत्मविश्वासाच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वत:ची ओळख निर्माण केलेल्या तळागाळाच्या स्तरावरील व्यक्तींचा या माध्यमातून सन्मान करण्यात येईल.

राष्ट्रीय स्वयंसिद्ध सम्मान
एक पहल बदलाव की ओर

जेणेकरून त्यांच्यापासून समाजातील उपेक्षित वर्गाला प्रेरणा मिळेल. त्यामुळे तळातील गुणवत्तेचा शोध घेणे आणि त्यांना ओळख मिळवून देणे, हा आमचा उद्देश आहे. स्त्री सक्षमीकरण, उद्योजकता (नवे उद्योग), शिक्षण, शेती, ग्रामीण विकास, समाजसेवा, सामाजिक कार्य, कला, हस्तकला (पुरातन वारसा, ग्रामीण हस्तकला), उपजीविका/ व्यावसायिक कौशल्ये, आरोग्य, प्रयोगशीलता, तंत्रज्ञान (विज्ञानविषयक) व पर्यावरण अशा १० वर्गवाऱ्यांमध्ये हे पुरस्कार दिले जाणार आहेत. याअंतर्गत १० व्यक्ती आणि १० संस्थांना १० पुरस्कार देण्यात येतील. प्रत्येकी १ लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक असे पुरस्काराचे स्वरूप आहे, असे त्यांनी सांगितले.

युनायटेड नेशन्स ग्लोबल इम्पॅक्ट नेटवर्क इंडिया ही या पुरस्कारांची नॉलेज पार्टनर आहे. त्याचे कार्यकारी संचालक पूरण पांडे म्हणाले, भारतातील तळागाळातील नेतृत्वाचा शोध घेण्याचा हा बहुस्तरीय व निष्पक्ष उपक्रम आहे. प्रादेशिक स्तरावरील ४ व राष्ट्रीय स्तरावरील १ ज्युरी यांच्या सहाय्याने अतिशय न्याय्य पद्धतीने पुरस्कार विजेत्यांची नावे निश्चित केली जाणार आहेत. या पुरस्काराकरिता अर्ज घेण्याची सुरुवात झाली असून, २५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. सदर अर्ज jsplfoundation.co.in/swayamsiddh वरून डाऊनलोड करून वा ऑनलाईन भरता येणार असल्याचे सांगण्यात आले.